TENTH ISSUE : APRIL 2018

MAKE MY DREAM FOUNDATION
A Completeness with unlimited abilities...

# ड्रीमलाईट

Regn. No.: E 5330 (Pune), Under Bombay Public Trust Act, 1950.

## कार्यकारी विश्वस्तांच्या नजरेतून...



नमस्कार!!!!

हे वर्ष म्हणजे नवनवीन उपक्रमांची भाऊगर्दी, उत्साहपूर्ण वातावरण, सकारात्मक उर्जा देणारे क्षण आणि प्रेरणात्मक आव्हाने यांची रेलचेल...

मेक माय ड्रीम फाउंडेशनची ह्यावर्षी स्पीच प्रोसेसर, संगीत स्पर्धा, मोबिलीटी प्रकल्प यांसारख्या नवीन उपक्रमांमधून वाटचाल चालू राहिली. विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रगतीसुद्धा उत्साहवर्धक ठरली.

संस्था भविष्यात सर्व प्रकारच्या दिव्यांग मुलांसाठी कार्य करण्यासाठी वचनबद्ध आहे. त्या दिशेने पुढचे पाऊल टाकताना नोव्हेंबर २०१७ मध्ये पूर्वा कदम या जन्मतः कर्णबधिर मुलीसाठी एक आव्हानात्मक उपक्रम समोर आला.पूर्वासाठी नवीन स्पीच प्रोसेसरची किंमत तिच्या आईच्या आवाक्याबाहेरची असल्याने, पूर्वाची आई मदतीसाठी संस्थेकडे आली. या साठी आवश्यक चौकशी व शोधप्रक्रिया करून आम्ही हा प्रकल्प यशस्वीरित्या पूर्ण केला. आधीच्या स्पीच प्रोसेसरमुळे पूर्वा फक्त एका कानाने ऐकू शकत होती. पण या नवीन उपकरणामुळे पूर्वा आता दोन्ही कानांनी ऐकू लागली आहे. तिचे सामाजिक आयुष्य आता अजूनच उंचावेल, याची मला खात्री आहे. मला अत्यंत अभिमान वाटतो की, केवळ एका महिन्याच्या कालावधीमध्ये नवीन स्पीच प्रोसेसरसाठी लागणारे रु.५.६०लाख आम्ही जमवू शकलो. या कार्यास हातभार लावलेल्या सर्वांची मी मनःपूर्वक ऋणी आहे.

शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मध्ये संस्थेने ५ नवीन विद्यार्थांना प्रवेश दिला. त्यापैकी एक विद्यार्थीनी कर्णबधिर आहे तर दुसरी अंशतः दृष्टिहीन आहे. विविध प्रकारच्या दिव्यांग विद्यार्थ्यांबरोबर कार्य करण्याच्या या संधीने त्यांचे प्रश्न आम्ही जवळून अनुभवत आहोत. मूकबधीर आणि दृष्टिहीन जगाचे प्रश्न समजून घेऊन, त्यावर योग्य पर्याय शोधून काढणे, हे खूपच आव्हानात्मक आहे.

दिव्यांग मुलांच्या प्रश्नांवर उत्तरे शोधताना लवकर (बालपणी) निदान, उपाययोजना या विषयाचा उल्लेख केला होता. विशेष मुलाच्या विशिष्ट गरजांकडे लहानपणीच लक्ष देऊन उपाययोजना केल्या तर, मोठेपणी निर्माण होणाऱ्या प्रश्नांची गंभीरता नक्कीच कमी होईल. या अत्यंत गंभीर विषयाबाबत मोठ्या प्रमाणावर जागरूकता निर्माण झाली पाहिजे.

चित्रकला स्पर्धेला विविध दिव्यांग मुलांचा मिळालेला उत्स्फूर्त प्रतिसाद बघून, विशेष मुलांमध्ये असलेल्या सुप्त गुणांना योग्य वाव मिळावा, या हेतूने काहीतरी नवीन उपक्रम या वर्षी करावा, अशी आंतरिक इच्छा होती. यातूनच या विशेष मुलांची संगीत स्पर्धा ही कल्पना नोव्हेंबर २०१७ मध्ये पटावर आली आणि 'स्वप्न स्वरांचे' या स्पर्धेच्या आखणीस सुरुवात झाली. गायन व वादन या प्रकारात नियोजनपूर्व आखणी करून स्पर्धा घ्यायचे ठरले. पुणे शहरातील विशेष शाळा, संस्थांमार्फत जास्तीत जास्त विविध दिव्यांग विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न केला. एकूण २० शाळा व संस्थांमधून १८८ मुलांनी पात्रता फेरीत उत्स्फूर्त सहभाग घेतला. काही स्पर्धक तर ३५ वयापेक्षा जास्तीचे होते. पात्रता फेरीचे अनुभव अत्यंत अविस्मरणीय आहेत. पात्रता फेरी ८ जानेवारी ते १५ फेब्रवारी २०१८ या काळात संबंधित संस्थेत झाली. मुलांची तयारी जोरदार होती. मुले त्यांची कला आमच्यासमोर सादर करण्यासाठी वाट पाहत असायची. निखळ आनंद, निरागस प्रतिसाद, एकमेकांच्यातील खेळीमेळीची स्पर्धा अशा अनोख्या अनुभवांचे आम्ही साक्षीदार आहोत. या मुलांचा हा आनंदाचा ठेवा जपून ठेवताना, संगीत शिक्षकांची होणारी तारांबळ व पडद्यामागचे त्यांचे अथक प्रयत्न मनाला खूप स्पर्शून गेले.

आमचा मोबिलीटी प्रकल्प हा शारीरिक विकलांग मुलांच्या दैनंदिन प्रवासाच्या प्रश्नावर सखोल विचार करून त्यांच्या स्वावलंबन व आत्मसन्मान यासाठी काढलेली एक यशस्वी योजना आहे. त्यांच्या अदृश्य अडचणींवर 'बिनव्याजी वाहन कर्ज' हा एक अनोखा उपाय ठरला. या उपक्रमामुळे लाभार्थींना कर्ज परतफेडीच्या जबाबदारीची जाणीव निर्माण होते. मुलांमध्ये वेळेवर कर्ज परतफेडीची भावना सकारात्मकपणे रुजवून, त्याद्वारे आपल्या बांधवाना मदतीचा हात आपणच पुरवू शकतो, ही संकल्पना रुजवायला आम्ही यशस्वी ठरलो आहे. लोकसहभागातून 'बिनव्याजी वाहन कर्ज' संकल्पना राबवणारी मेक माय ड्रीम फाउंडेशन ही पहिली संस्था आहे. या संकल्पनेस संबंधित देणगीदारांचा संपूर्ण पाठींबा असून त्यासाठी वेगळा फंड संस्थेकडे जमा आहे, हे नमूद करताना मला आनंद होत आहे.

'गुरुकुल' हे आमचे एक असे स्वप्न आहे ज्याच्या पूर्ततेचा आम्हांला ध्यास आहे. गुरुकुलासाठी जागेचा शोध चालू असून साधारण १ एकर जागा घेण्यासाठी अंदाजे रु. १ कोटी रकमेची गरज आहे. संस्थेच्या अनेक व्यवस्थापकीय खर्चात काटकसर करून आत्तापर्यंत संस्थेने १/३ रक्कम जमा केली आहे. या प्रकल्पाची गती वाढवण्यासाठी मी सर्वांना आवाहन करते की, आपल्या संपर्कातून अनेक स्रोतांपर्यंत पोहोचण्यासाठी आपण आम्हांला मदत करा. ज्यामुळे हे मोठे स्वप्न सहज साकार होऊ शकेल. आपल्या सर्वांना मिळून निश्चितच फार मोठी वाटचाल करावयाची आहे.

मेक माय ड्रीम फाउंडेशनच्या सर्व देणगीदारांची, पाठीराख्यांची, कार्यकर्त्यांची मी अत्यंत मनःपूर्वक ऋणी आहे. मला खात्री आहे की नेहमीप्रमाणेच तुम्ही सर्व आमच्या पुढील सर्व उपक्रमांमध्ये भागीदार असाल आणि संस्थेच्या यशस्वी वाटचालीचे साक्षीदार असाल...

**मेधा कुलकर्णी**, कार्यकारी विश्वस्त

## वार्षिक स्नेह संमेलन






मेक माय ड्रीम फाउंडेशनचा ८ वा वर्धापनदिन व वार्षिक स्नेह संमेलन प्रसिद्ध व्यंगचित्रकार श्री. मंगेश तेंडूलकर यांच्या उपस्थितीत म. ए. सो. नाट्यगृह, बाल शिक्षण, कोथरूड, पुणे येथे ९ एप्रिल २०१७ रोजी संपन्न झाला. संस्थेमधील विद्यार्थ्यांच्या गायनाने, तसेच दृष्टिहीन व्हायोलिन वादक संजय उपाध्ये ह्यांच्या आविष्काराने संपूर्ण संध्याकाळ संगीतमय झाली होती.

संस्थेकडे कायमस्वरूपी ठेव म्हणून देणगी रकमेवरील व्याजातून गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. तसेच जबाबदार पालकांना 'सुजाण पालकत्व' हे पारितोषिकही देण्यात आले.

जानेवारी २०१७ मध्ये संस्थेतर्फे पुणे शहरातील शारीरिक विकलांग, कर्णबधिर, सेरेब्रल पाल्सी व मतिमंद अशा विशेष मुलांसाठी 'मिसेस नीलिमा दिलीप गोळे' चित्रकला स्पर्धा आयोजित केली. विशेष मुलांच्या संस्थांकडून स्पर्धेला उत्तुंग प्रतिसाद मिळून २९१ विशेष मुले स्पर्धेत सहभागी झाली होती. वयोगट व दिव्यांगाचा प्रकाराप्रमाणे ६ गटात स्पर्धा घेण्यात आली. या कार्यक्रमात सर्व गटांमधील विजेत्यांना कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रसिद्ध व्यंगचित्रकार श्री. मंगेश तेंडूलकर यांच्या हस्ते पारितोषक वितरण करण्यात आले. कार्यक्रमाचे नेटके सूत्रसंचालन साद उपक्रम केंद्रांच्या संचालिका, निवेदिका विनया देसाई यांनी केले.











# यशोगाथा

आम्हांला सांगण्यास अत्यंत अभिमान वाटतो की आमच्या आत्तापर्यंतच्या मागील सर्व वर्षातील विद्यार्थ्यांनी १२ वीची परीक्षा यशस्वीपणे उत्तीर्ण केली आहे. मार्च २०१८ ला सहा मुलांनी बारावीची परीक्षा दिली आहे.

## माजी विद्यार्थ्यांची प्रगती




**इरफान पठाण** व **युवराज अहिरे** - २०११-२०१२ वर्षीचे हे दोन्ही विद्यार्थी खासगी क्षेत्रामध्ये नोकरी करून असून गेली ५ वर्षे स्वतःच्या दैनंदिन खर्चांची उत्तम काळजी घेऊन स्वावलंबी आयुष्य जगत आहेत. दोघांनी त्यांचे ठरलेले अभ्यासक्रम यशस्वीरित्या पूर्ण केले असून संस्थेने त्यांना बिनव्याजी वाहन कर्ज योजनेत दोन चाकी गाडी घेऊन दिली आहे. इरफान सध्या स्वतःचे कॉफी शॉप चालवीत असून ग्राफिक डिझायनर म्हणूनही काम करीत आहे. युवराज अहिरे मोबाईल शॉपमध्ये सर्विस इंजिनिअर म्हणून काम करीत आहे.



**अक्षदा लंगोटे** व **सुनिता शिंदे** - २०११-२०१२ वर्षीच्या या विध्यार्थीनी १२ वी पर्यंतचे शिक्षण पूर्ण झाल्यावर काही वर्षेखासगी क्षेत्रात काम करीत होत्या. अक्षदाचे २०१६ साली लग्न झाले तर सुनीताचे मे २०१७ मध्ये लग्न झाले. दोघीही सांसारिक जीवनात समाधानी आहेत. सुनिता शिंदे हिला संस्थेने बिनव्याजी वाहन कर्ज प्रकल्प अंतर्गत मदत केली होती.



**जालिंदर बांडे** - २०१६-२०१७ वर्षीचा ह्या विद्यार्थ्याने पुनर्वसन कार्यक्रमांतर्गत १० वीची परीक्षा दिली परंतु तो यशस्वी होऊ शकला नाही. त्याचे माजी विद्यार्थिनी सुनिता शिंदे हिच्याबरोबर लग्न झाले असून दोघेही सुखी जीवन जगत आहेत.

## पुढील शिक्षण घेत असलेल्या माजी विद्यार्थ्यांची प्रगती

### २०१२ - १३ बॅच



**आकाश पवार** - द्वितीय वर्ष कॉम्प्युटर ॲप्लिकेशन प्रथम श्रेणीमध्ये उत्तीर्ण झाल्यावर, आकाशला तृतीय वर्षात अडचणी आल्या. तो सध्या तृतीय वर्षातील राहिलेल्या विषयाचा अभ्यास करीत असून, ऑगस्ट २०१७ पासून तो शिवाजीनगर येथील सायबर कॅफेमध्ये पूर्णवेळ काम करतो.



**शीतल शिंदे** - संस्थेच्या मदतीने १२ वीची परीक्षा यशस्वीपणे उत्तीर्ण झाल्यावर, शीतल सध्या पिंपळसुटी या तिच्या गावी राहून तृतीय वर्ष कॉम्प्युटर ॲप्लिकेशन करीत आहे.



**उमा घुसाईवाल** - संस्थेच्या मदतीने १२वीची परीक्षा यशस्वीपणे उत्तीर्ण झाल्यावर, उमा गेली ३ वर्षे श्री स्टार हॉटेल मध्ये पूर्ण वेळ काम करीत आहे. भविष्यात उमाला हॉटेल मॅनेजमेंट मधील पुढील शिक्षण घ्यायचे आहे.

### २०१३ - १४ बॅच



**सागर भारत** - संस्थेच्या मदतीने १२ वीची परीक्षा यशस्वीपणे उत्तीर्ण झाल्यावर, सध्या सागर खासगी बँकेसाठी रिटेल लोन विक्रेता म्हणून काम करीत आहे. पुढील शिक्षण बहिस्थ विद्यार्थी म्हणून पूर्ण करणार आहे.



**सनी दिघे** - संस्थेच्या मदतीने १२ वीची परीक्षा यशस्वीपणे उत्तीर्ण झाल्यावर, सनी सध्या एस. पी. कॉलेज येथे तृतीय वर्ष कला शाखेचे शिक्षण घेत आहे. भविष्यात त्याला स्पर्धा परीक्षांची तयारी करायची आहे.



**संगीता म्हस्के** - अभिनव कला महाविद्यालय, पाषाण येथून २ वर्षांचे शिक्षण संस्थेच्या मदतीने पूर्ण केल्यावर संगीताने २ वर्षे सायबर कॅफेमध्ये काम केले. प्रकृती अस्वास्थ्यामुळे तिच्या शिक्षणात सध्या खंड पडला आहे.

### २०१४ - १५ बॅच



**विठ्ठल खांडेकर** - संस्थेच्या मदतीने १२ वीची परीक्षा यशस्वीपणे उत्तीर्ण झाल्यावर, विठ्ठलने प्रथम वर्ष वाणिज्यचे शिक्षण गरवारे कॉलेजमधून पूर्ण केले. प्रकृती अस्वास्थ्यामुळे त्याच्या शिक्षणात सध्या खंड पडला आहे.



**संगीता जिरेकर** - संस्थेच्या मदतीने १२ वीची परीक्षा यशस्वीपणे उत्तीर्ण झाल्यावर, संगीताने प्रथम वर्ष वाणिज्यचे शिक्षण शाहू कॉलेजमधून पूर्ण केले व सध्या ती द्वितीय वर्षाचे शिक्षण घेत आहे. भविष्यात तिला सरकारी नोकरीसाठी प्रयत्न करावयाचा आहे.

### २०१५ - १६ बॅच



**पौर्णिमा पार्टे** - संस्थेच्या गजवडी गावातील ग्रामीण केंद्राच्या ह्या विद्यार्थिनीने द्वितीय वर्ष वाणिज्य सातारा येथील कॉलेज मधून ६८% मार्क्स मिळवून पूर्ण केले. सध्या ती तृतीय वर्ष वाणिज्य करीत आहे.

### २०१६ - १७ बॅच



**आशुतोष कोरडे** - संस्थेच्या मदतीने ११ वीची परीक्षा यशस्वीपणे उत्तीर्ण झाल्यावर, आशुतोष सध्या १२ वी वाणिज्य एम. एम. ज्युनिअर कॉलेज मधून करीत आहे.

## पुनर्वसन कार्यक्रमांतर्गत शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांची प्रगती

### २०१२ - १३ बॅच



**रीना गुप्ता** - सरकारी तंत्रनिकेतन कॉलेज, पुणे येथून कॉम्प्युटर इंजिनिअरींगचा डिप्लोमा ७०% गुणांनी पूर्ण केल्यानंतर, रीना कॉम्प्युटर इंजिनिअरींगच्या पदवी चे शिक्षण एम. आई. टी. कॉलेज येथून संस्थेच्या मदतीने पूर्ण करीत आहे. सध्या ती तृतीय वर्ष इंजिनिअरींग करीत आहे.

### २०१३ - १४ बॅच



**आकाश दसगुडे** - संस्थेच्या मदतीने १२ वीची परीक्षा यशस्वीपणे उत्तीर्ण झाल्यावर, सध्या आकाश तृतीय वर्ष कला शाखेचे शिक्षण एस. पी. कॉलेज येथून पूर्ण करीत आहे. मेक माय ड्रीम फाऊंडेशनच्या प्रयत्नाने आकाश गेले दीड वर्षे स्पार्क या संस्थेत संगणक ऑपरेटर म्हणून काम करीत आहे. जून २०१७ मध्ये संस्थेने आकाशला दुचाकी घेण्यासाठी बिनव्याजी वाहन कर्ज स्वरूपात मदत केलेली आहे. त्यामुळे आकाशची दैनंदिन कामकाजात तारांबळ होत नाही.

### २०१४ - १५ बॅच



**सुरेश राठोड** - संस्थेच्या मदतीने १२ वीची परीक्षा यशस्वीपणे उत्तीर्ण झाल्यावर, सध्या सुरेश द्वितीय वर्ष कला शाखेचे शिक्षण एस. पी. कॉलेज येथून पूर्ण करीत आहे. मेक माय ड्रीम फाऊंडेशनच्या प्रयत्नाने सुरेश गेले दीड वर्षे स्पार्क या संस्थेत संगणक ऑपरेटर म्हणून अर्धवेळ काम करीत आहे. जून २०१७ मध्ये संस्थेने सुरेशला दुचाकी घेण्यासाठी बिनव्याजी वाहन कर्ज स्वरूपात मदत केलेली आहे. त्यामुळे सुरेशची दैनंदिन कामकाजात तारांबळ होत नाही.



**सायली इंगळे** - १२ वी एम.सी.व्ही.सी. हॉर्टीकल्चर ७०% गुणांनी पूर्ण केल्यावर, सायली सध्या यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ, उरळीकांचन येथे ३ वर्षांचा ॲग्रीकल्चर डिप्लोमा संस्थेच्या मदतीने करीत आहे. सप्टेंबर २०१७ पासून पुण्यात एका पुस्तकाच्या दुकानातही काम करीत आहे.

### २०१५ - १६ बॅच



**ओंकार कदम** - संस्थेच्या गजवडी गावातील ग्रामीण केंद्राच्या ह्या विद्यार्थ्याने ११ वी कला शाखेचे शिक्षण पूर्ण करून सध्या त्याने १२ वीची परीक्षा दिली आहे. ओंकार जन्मतः कर्णबधीर असून, पुनर्वसन कार्यक्रमांतर्गत बाहा इम्प्लांट ही शस्त्रक्रिया झाल्याने तो यंत्राच्या साहाय्याने आता व्यवस्थित ऐकू शकतो. यामुळे त्याच्या अभ्यासातील अडचणी कमी झाल्या आहेत.

### २०१६ - १७बॅच



**जयनारायण महतो** - संस्थेच्या मदतीने शास्त्र शाखेमधून ११ वीची परीक्षा यशस्वीपणे उत्तीर्ण झाला. जयनारायणने मार्च २०१८ मध्ये १२ वीची परीक्षा दिली आहे. सध्या तो सी. ई. टी. ची तयारी करीत असून, भविष्यात त्याला इंजिनिअरिंगचे शिक्षण घ्यावयाचे आहे.



**रंगनाथ गाडेकर** - प्रथम वर्ष फाईन आर्ट चे शिक्षण यशस्वीपणे पूर्ण करून, रंगनाथ सध्या फाईन आर्टचे पदवी शिक्षण जे. जे. इन्स्टिट्यूट, मुंबई येथून संस्थेच्या मदतीने पूर्ण करीत आहे.



**अक्षय सिनलकर** - संस्थेच्या मदतीने ११ वी कला शाखेची परीक्षा यशस्वीपणे पूर्ण करून, अक्षयने नुकतीच १२ वीची परीक्षा दिली आहे. तो पूर्णतः कर्णबधीर असून त्याला भविष्यात आय. टी. आय. चे शिक्षण घ्यावयाचे आहे.

## नवीन विद्यार्थी



**कल्याणी काळे** - संस्थेच्या मदतीने ११ वी वाणिज्य शाखेची परीक्षा यशस्वीपणे पूर्ण करून, कल्याणीने १२ वीची परीक्षा दिली आहे. भविष्यात ती पदवीपर्यंतचे शिक्षण पूर्ण करून सरकारी नोकरीसाठी प्रयत्न करणार आहे.



**रविंद्र शिंदे** - संस्थेच्या मदतीने ११ वी एम. सी. व्ही. सी. टूरीझम शाखेची परीक्षा यशस्वीपणे पूर्ण करून, रविंद्रने नुकतीच १२ वीची परीक्षा दिली आहे. भविष्यात त्याला टुरिझम उद्योग जगतात काम करावयाचे आहे.



**नागीण चलवादी** - संस्थेच्या मदतीने ११ वी कला शाखेची परीक्षा यशस्वीपणे पूर्ण करून, नागीणने नुकतीच १२ वीची परीक्षा दिली आहे. ती पूर्णतः कर्णबधीर असून तिला भविष्यात पदवी शिक्षण पूर्ण करावयाचे आहे.

### २०१७-२०१८ बॅचमध्ये प्रवेश घेतलेले नवीन विद्यार्थी



**दिक्षा साबळे** - वय १९ वर्षे- उजवा हात आणि उजवा पाय चेतासंस्थेच्या आजारामुळे बधीर - मे २०१७मध्ये सरकारी तंत्रनिकेतन येथून इ.एन.टी.सी. डिप्लोमा ८४% गुण मिळवून पूर्ण - डिप्लोमा पर्यंतचे शिक्षण आईच्या मदतीने व सरकारी स्कॉलरशिप मिळवून पूर्ण केले - एम.आई.टी. कॉलेज पुणे येथे इ.एन.टी.सी. इंजिनिअरींग पदवी अभ्यासक्रमासाठी प्रवेश - पुनर्वसन कार्यक्रमांतर्गत पदवीपर्यंतच्या शिक्षणाचा शैक्षणिक खर्च तसेच होस्टेल व मेस, पुस्तके व युनिफॉर्म यासाठी संस्थेतर्फे मदत केली जाते.



**राजेश्वरी जांभूळकर** - वय २४ वर्षे - दोन्ही डोळ्यांना अंशतः दृष्टी - मे २०१७ मध्ये पार्वतीबाई अध्यापिका कॉलेज मधून प्रथम वर्ष डीएल. एड. चे शिक्षण पूर्ण - पदवीपर्यंतचे शिक्षण पालकांच्या मदतीने पूर्ण केले - द्वितीय वर्ष डीएल. एड. ला प्रवेश - पुनर्वसन कार्यक्रमांतर्गत तिला द्वितीय वर्षाचे शिक्षण पूर्ण करण्यास, शैक्षणिक खर्च यासाठी संस्थेतर्फे मदत केली जाते.



**पूर्वा कदम** - वय १४ वर्षे - दोन्ही कानांनी पूर्ण कर्णबधीरत्व - मॉडर्न हायस्कूल मध्ये ८ वी इयत्तेत शिकत आहे - शिक्षणाचा खर्च आई करते - पुनर्वसन कार्यक्रमांतर्गत तिला नवीन स्पीच प्रोसेसर दिला आहे ज्यामुळे ती दोन्ही कानांनी ऐकू शकते - तिच्या अभ्यासातील अडचणी कमी झाल्या आहेत. (यशोगाथा पुढील पानावर)



**पवन झांबरे** - वय १६ वर्षे - डावा पाय जन्मतः गुढघ्यापर्यंत - अपंग कल्याणकारी केंद्र वानवडी, येथून १० वी पर्यंतचे शिक्षण पूर्ण केले - गरवारे कॉलेज येथे ११ वी वाणिज्य साठी प्रवेश - पुनर्वसन कार्यक्रमांतर्गत त्याला पदवी पर्यंत शिक्षण पूर्ण करण्यास, शैक्षणिक खर्च व मेसखर्च यासाठी संस्थेतर्फे मदत केली जाते.



**विष्णू अजगर** - वय १६ वर्षे - डावे मनगट व कोपरा सर्पदंशाने बाधित - अपंग कल्याणकारी केंद्र वानवडी, येथून १० वी पर्यंतचे शिक्षण पूर्ण केले - गरवारे कॉलेज येथे ११ वी वाणिज्य साठी प्रवेश - पुनर्वसन कार्यक्रमांतर्गत त्याला पदवी पर्यंत शिक्षण पूर्ण करण्यास, शैक्षणिक खर्च व मेसखर्च यासाठी संस्थेतर्फे मदत केली जाते.

## विशेष उल्लेख

मुंबईच्या **मिसेस ज्योत्स्ना म्हसकर** यांनी सालाबादप्रमाणे रु. २,००,०००/- देणगी मुलांच्या शिक्षणासाठी दिली. त्यांच्या या अनमोल मदतीमुळे ही वंचित मुले उच्च शिक्षण घेत आहेत, त्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार.

**ग्रेट सॉफ्टवेअर लॅबोरेटरी प्रा. लि.** कंपनीने गेल्या वर्षीप्रमाणे मुलांच्या शिक्षणासाठी २०१८-१९ या शैक्षणिक वर्षासाठी रु.५,००,०००/- देणगी दिली. कंपनीचे प्रमुख, व्यवस्थापन, सी. एस. आर. टीम यांचे मनःपूर्वक आभार.

**श्री. व्ही. बालाजी राव,** डीजीएम, सेन्ट्रल बँक ऑफ इंडिया यांनी त्यांची मुलगी प्रिया हिच्या लग्नानिमित्त आवाहन करून संस्थेसाठी रु.३८,०००/- ची देणगी जमवली व अनेक नवीन देणगीदार संस्थेशी जोडले गेले त्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार.

## उपक्रम / कार्यक्रम

### कौशल्य विकास - इंग्रजी संभाषण



ऑगस्ट २०१७ पासून दीपा बापट, प्रशिक्षक आणि प्लेसमेंट अधिकारी, वाडिया कॉलेज, पुणे या आपल्या विद्यार्थ्यांसाठी इंग्रजी संभाषण कलेचा वर्ग घेत आहेत. इंग्रजी संभाषण कला प्रात्यक्षिक पद्धतीने शिकवण्याची त्यांची हातोटी मुलांमध्ये अत्यंत प्रिय आहे. या कौशल्य विकासामुळे मुलांचा आत्मविश्वास वाढला आहे. त्यांच्या इंग्रजी संभाषणामध्ये पूर्वीपेक्षा बरीच प्रगती होत आहे. या साठी आपला अनमोल वेळ व निरपेक्ष मदतीचा हात दिल्याबद्दल मिसेस दीपा बापट यांचे मनःपूर्वक ऋणी आहोत.



### सामाजिक भान - देणे समाजाचे २०१७ प्रदर्शनास भेट

सालाबादप्रमाणे आमच्या विद्यार्थ्यांनी 'देणे समाजाचे' या सामाजिक संस्थांच्या प्रदर्शनास भेट दिली आणि सामाजिक कार्य करणाऱ्या नवीन संस्थांच्या कार्याची माहिती घेतली.





### प्रदर्शन - जीवन सरिता




१९ एप्रिल २०१७ रोजी, आर्ट ऑफ लिविंग, पुणे आयोजित 'जीवन सरिता' या कार्यक्रमाचे निमित्ताने सामाजिक संस्थांच्या प्रदर्शनामध्ये मेक माय ड्रीम फाऊंडेशनला सहभागी होण्याची संधी मिळाली. संस्थेच्या कार्याची माहिती अनेक लोकांपर्यंत पोहोचवण्यास या प्रदर्शनाचा उपयोग झाला. एक मोठे व्यासपीठ उपलब्ध करून दिल्याबद्दल आर्ट ऑफ लिविंग, पुणे यांचे मनःपूर्वक आभार.

## मोबिलिटी प्रोजेक्ट - एक वेगळा उपक्रम



मेक माय ड्रीम फाऊंडेशनचा विशेष मुलांना विविध प्रकारच्या संधी उपलब्ध द्यायचा नेहमीच प्रयत्न असतो. आमच्या प्रमुख उद्दिष्टांपैकी शिक्षणातून स्वावलंबनाचा यशस्वी मार्ग ही कल्पना मुलांपर्यंत पोचवताना कमावत्या मुलांसाठी बिनव्याजी वाहन कर्ज ही योजना उदयास आली. मुलांच्या दैनंदिन प्रवासाच्या प्रश्नावर सखोल विचार करून त्यांच्या स्वावलंबन व आत्मसन्मान यासाठी काढलेल्या या योजनेस देणगीदारांकडून मनःपूर्वक प्रतिसाद मिळाला.

जुलै २०१४ पासून इरफान पठाण, युवराज अहिरे व सुनिता शिंदे या ३ माजी विद्यार्थ्यांना बिनव्याजी वाहन कर्ज स्वरुपात शारीरिक व्यंगाप्रमाणे योग्य बदल केलेली ॲक्टिव्हा गाडी घेऊन देण्यात आली. या प्रकल्पासाठी काही देणगीदारांकडून संस्थेकडे जमा झालेल्या कायमस्वरूपी देणगी रु. २.४० लाख मधून या गाड्या घेण्यात आल्या. आम्हांला सांगण्यास अभिमान वाटतो की सर्व विद्यार्थी कर्जाची परतफेड अत्यंत नियमितपणे करीत असून, सुनिता शिंदे या विद्यार्थिनीने कर्जाच्या संपूर्ण रकमेची परतफेड केली आहे.

जून २०१७मध्ये संस्थेने आकाश दसगुडे व सुरेश राठोड या दोन विद्यार्थ्यांना बिनव्याजी वाहन कर्ज स्वरुपात शारीरिक व्यंगाप्रमाणे योग्य बदल केलेली ॲक्टिव्हा गाडी घेऊन देण्यात आली. दोघेही कर्जाची परतफेड जुलै २०१७ पासून नियमितपणे करीत आहेत.

सारांश : संबधित मुलांनी नियमितपणे कर्जाची रक्कम परतफेड केल्यामुळे याच फंड मधून अधिकाधिक गरजू विद्यार्थ्यांना मदत करता येते, या कल्पनेत या प्रकल्पाचे यश दडले आहे. या उपक्रमामुळे लाभार्थींना कर्ज परतफेडीसंदर्भात जबाबदारीची जाणीव निर्माण होते व त्यांना समाजा प्रति असलेले त्यांचे दायित्व समजते.

# उपक्रम / कार्यक्रम

## प्रदर्शन - उर्जा २०१७

५ व ६ ऑक्टो २०१७ रोजी संस्थेने उर्जा २०१७ या साद उपक्रम केंद्र, पुणे यांनी दिव्यांग संस्थांनी केलेल्या वस्तू विक्रीसाठी आयोजित केलेल्या प्रदर्शनात भाग घेतला होता. त्यामुळे संस्थेच्या कार्याची माहिती अनेक लोकांपर्यंत पोहोचली. आमच्या विशेष मुलांनी





बनविलेल्या वस्तूंच्या विक्रीसाठी व्यासपीठ उपलब्ध करून दिल्याबद्दल साद उपक्रम केंद्र यांचे मन:पूर्वक आभार.

## परिसंवाद - जागतिक मानसिक आरोग्य दिवस निमित्ताने जागरूकता चळवळ



११ व १२ ऑक्टो २०१७ रोजी, महाराष्ट्र सरकार व दिव्यांग विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने पुणे शहरात २ दिवस जागतिक मानसिक आरोग्य दिवस साजरा केला गेला. मेक माय ड्रीम फाऊंडेशनला या परिसंवादात व प्रदर्शनात सहभागी होण्याची संधी मिळाली. प्रदर्शनाद्वारे आमच्या विशेष मुलांनी बनविलेल्या वस्तूंची विक्री आम्ही करू शकलो. महाराष्ट्रातील असंख्य विशेष शिक्षक, सामाजिक कार्यकर्ते, सामाजिक संस्था व विशेष मुलांच्या शाळांचे प्रतिनिधी यांनी या परिसंवादास हजेरी लावली व संस्थेच्या कार्याबद्दलची माहिती घेतली. संस्थेस एक मोठे व्यासपीठ उपलब्ध करून दिल्याबद्दल आयोजकांचे मन:पूर्वक आभार.

## ओकायामा (जपान) गाकूगेईकान हायस्कूलच्या विद्यार्थ्यांची संस्थेस भेट



ऑगस्ट २०१७ मध्ये ओकायामा गाकूगेईकान हायस्कूलचे प्रमुख श्री. व सौ. मायुमी मोरी यांनी संस्थेस भेट देऊन संस्थेच्या कार्याची सविस्तर माहिती घेतली. या भेटीचा प्रमुख उद्देश डिसेंबर २०१७ मध्ये त्यांच्या शाळेच्या विद्यार्थ्यांच्या भेटीसंदर्भात निर्णय घेणे हा होता.



ओकायामा (जपान) गाकूगेईकान हायस्कूलच्या आठ विद्यार्थ्यांनी १९ डिसेंबर २०१७ रोजी मेक माय ड्रीम फाऊंडेशनला भेट दिली. त्यांच्याबरोबर शिक्षक, पालक आणि शाळेच्या संचालिका मिसेस मिचिको मोरी होत्या. भेटीचा प्रमुख उद्देश शाळा व संस्था यांनी एकमेकांच्या कार्याचा परिचय करून घेणे, वैचारिक देवाणघेवाण, एकमेकांच्या कार्यामागची प्रेरणा व तत्त्वज्ञान समजून घेणे हा होता. आमच्या विद्यार्थ्यांना भारताचे प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळाल्याने ते प्रभावित झाले होते. त्यांची परदेशी विद्यार्थ्यांबरोबरची पहिलीच भेट अत्यंत अविस्मरणीय झाली.



फ्रेंड्स ऑफ असोसिएशन जपान या संस्थेच्या सदस्यांनी या भेटीचे आयोजन केले होते त्याबद्दल त्यांचे मन:पूर्वक आभार.



# विशेष उपक्रम

## स्पीच प्रोसेसर



पूर्वासाठी स्पीच प्रोसेसरचा उपक्रम यशस्वीपणे पूर्ण केल्याबद्दल आम्ही अतिशय समाधानी आहोत....

बारामतीची पूर्वा कदम हिला जन्मतः दोन्ही कानांना कर्णबधीरत्व होते. जानेवारी २००९मध्ये पूर्वाची कॉकलिअर इम्प्लांट ही शस्त्रक्रिया के. ई. एम. हॉस्पिटल, पुणे येथे केली होती. त्यानंतर स्पीच थेरपी व पुनर्वसनामुळे पूर्वाला नीट ऐकू येऊ लागले. त्यामुळे पूर्वाचे सामान्य शाळेत शिक्षण सुरू झाले. पूर्वा समाजात अव्यंग मुलांसारखी मिसळू लागली व समाजाचा एक घटक बनली.

पूर्वा सध्या मॉडर्न हायस्कूल, पुणे येथे ८ वी इयत्तेत शिकत आहे. पूर्वाला उत्तम शैक्षणिक संधी उपलब्ध व्हाव्यात, म्हणून तिच्या आईने तिला पुण्याला आणले. मॉडर्न हायस्कूलमध्ये पूर्वाला विषय आकलनासाठी विशेष मदत मिळते. पूर्वाच्या वडिलांचे २००८ मध्ये कॅन्सरने दुख:द निधन झाले. त्यामुळे पूर्वाच्या संपूर्ण संगोपनाची जबाबदारी तिच्या आईवरच आहे.

२००९ मध्ये पूर्वाला जो स्पीच प्रोसेसर बसविला होता, त्याचे उत्पादन संबधित कंपनीने अचानक बंद केले आणि एकूणच गेल्या ८ वर्षामध्ये त्याची तांत्रिक क्षमता पण कमी झाली होती. त्यामुळे आधुनिक स्पीच प्रोसेसर घेणे क्रमप्राप्त झाले. नवीन स्पीच प्रोसेसरची किंमत रु.५,५८,७५०/- इतकी प्रचंड होती. एवढी रक्कम उभी करणे पूर्वाच्या आईच्या क्षमतेपलीकडे होते. त्यामुळे नोव्हेंबर २०१७ मध्ये पूर्वाच्या आईने आर्थिक मदतीसाठी मेक माय ड्रीम फाउंडेशनकडे संपर्क साधला. तेव्हापासून पूर्वाच्या पुनर्वसनाची जबाबदारी संस्थेने घेतली आहे. पूर्वाच्या शैक्षणिक वाटचालीत अडथळा येऊ नये व तिचे सामाजिक अस्तित्व कमी होऊ नये, यासाठी संस्थेने तिला आर्थिक मदत करण्याचे शिवधनुष्य उचलले.



स्पीच प्रोसेसर बनविणाऱ्या कंपनीशी चर्चा करून, नवीन स्पीच प्रोसेसर आधी केलेल्या इम्प्लांटला उपयुक्त आहे अशी खात्री पटल्यानंतर, संस्थेने कंपनीशी सवलतीसाठी बोलणी झाल्यानंतर रु.५०,०००/- ची सवलत कंपनीने दिली. त्यानंतर संस्थेने विविध देणगीदारांशी संपर्क साधून रु.२,१०,०००/- ची रक्कम जमा केली. पूर्वाच्या आईने रु.१,००,०००/- स्वतः जमवले व रु.२,००,०००/- सरकारी मदत मिळवली. सर्वांच्या प्रयत्नांना यश लाभले व संस्थेने नवीन स्पीच प्रोसेसरचा उपक्रम केवळ १ महिन्यात म्हणजेच डिसेंबर २०१७ मध्ये पूर्ण केला.

नवीन स्पीच प्रोसेसरमध्ये दोन्ही कानांना जोडणारी लिंक असल्याने, आता पूर्वा दोन्ही कानांनी व्यवस्थित ऐकू शकते व त्यामुळे तिचा आत्मविश्वास खूप वाढला असून ती पूर्वीपेक्षा समाजात जास्त मिसळू शकते.

पूर्वाची शैक्षणिक वाटचाल उत्तम चालू आहे. संस्थेच्या उद्दीष्टांप्रमाणे मेक माय ड्रीम फाऊंडेशन नेहमीच तिच्या या वाटचालीत तिला साथ करेल व पूर्वा आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी होईपर्यंत तिला आवश्यक मदत करण्याची जबाबदारी संस्थेने स्वीकारली आहे.

अशा उपक्रमाच्या पूर्ततेत पालकांचा पाठींबा अत्यंत महत्वाचा असतो आणि पूर्वाच्या आईने आपल्या मुलीच्या कल्याणासाठी उपक्रमात मन:पूर्वक सहभाग घेतला.

अनुपमा काबरा, ज्ञानदा आठवले, स्वामिनाथन लालगुडी, विनोद कुलकर्णी, आरती कुलकर्णी, केशरबाई हिरालाल सोनी मेमोरिअल ट्रस्ट, विजय कुमार रमणा मेटेल्लू, विद्या कुलकर्णी, अंजली पंचपोर, शैला खिस्ती, स्वरदा घरे आणि माधवी पुरंदरे यांनी या उपक्रमात केलेल्या आर्थिक मदतीबद्दल संस्था सर्वांची मन:पूर्वक आभारी आहे.





# नवीन उपक्रम – 'स्वप्न स्वरांचे' गायन वादन स्पर्धा

जानेवारी २०१७ मध्ये संस्थेतर्फे पुणे शहरातील सर्व प्रकारच्या विशेष मुलांसाठी सौ. नीलिमा दिलीप गोळे चित्रकला स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. विशेष मुलांच्या संस्थांकडून स्पर्धेला उत्तुंग प्रतिसाद मिळाला. विशेष मुलांमधील सुप्त गुणांना वाव मिळण्यासाठी विविध उपक्रम नियमितपणे आयोजित झाले पाहिजेत, या जाणीवेतून या वर्षी संगीत स्पर्धेची संकल्पना उदयास आली.

नोव्हेंबर २०१७ मध्ये 'स्वप्न स्वरांचे' या संगीत स्पर्धेची आखणी सुरू झाली. गायन व वादन या दोन्ही प्रकारासाठी स्पर्धा घेण्याचे ठरले. संगीत एक प्रत्यक्ष सादरीकरण कलेचा आविष्कार असल्याने व स्पर्धेतील सहभागी विशेष मुलांच्या मर्यादांचा आवाका पाहता, स्पर्धेची आखणी नियोजनबद्ध पद्धतीने करण्यात आली. त्यासाठी आरोही इव्हेंट्स चे श्री. अविनाश कुलकर्णी यांच्या टीमची मदत घेण्यात आली. स्पर्धा सर्व प्रकारच्या दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी खुली ठेवण्यात आली.

विशेष मुलांच्या शाळा, संस्था यामधील सर्व विद्यार्थ्यांना आवाहन करण्यात आले. पुणे व आसपासच्या २० विशेष शाळा, संस्थांच्या १८८ विद्यार्थ्यांची स्पर्धेसाठी नावनोंदणी झाली. ३५ वर्षापुढील विद्यार्थ्यांची पण नावे नोंदली गेली. त्यांना उत्तेजन मिळावे म्हणून पात्रता फेरीमध्ये त्यांची स्पर्धा घेण्यात आली व त्यातील काही जणांना उत्तेजनार्थ बक्षिसे देण्याचे निश्चित केले आहे.

दिव्यांग विद्यार्थ्यांच्या प्रवासाचा प्रश्न पाहता स्पर्धेची पात्रता फेरी प्रत्येक संस्थेत जाऊन घ्यायचे ठरले. त्याप्रमाणे ८ जानेवारी ते १५ फेब्रुवारी २०१८ या कालावधीमध्ये स्पर्धेची पात्रता फेरी सुरळीतपणे पार पडली. सर्व सहभागी संस्थांचे प्रमुख, संगीत शिक्षक यांचे विशेष आभार की ज्यांच्यामुळे आम्ही पात्रता फेरी संबधित संस्थेत पार पाडू शकलो. काही शाळांनी इतर शाळेतील विद्यार्थ्यांसमवेत सहभागी होण्याची तयारी दाखवली, त्यामुळे आम्ही एकूण १५ संस्थांमध्ये पात्रता फेरी घेऊन वेळ वाचवू शकलो. त्याबद्दल कामायनी शाळा, डॉन शाळा, इंटरविडा जागृती शाळा व बाल कल्याण संस्था यांचे विशेष आभार.

संगीत स्पर्धेत सहभागी विशेष शाळा, संस्थांची नावे पुढीलप्रमाणे आहेत.

| | |
|---|---|
| करुणांजली शाळा, तळेगाव | एसईसी, नायगाव |
| मुलांची अंध शाळा, कोरेगाव पार्क | लार्क, प्रभात रोड |
| इंटरविडा जागृती शाळा, मुंढवा | हेल्प लाईफ, कोंढवा |
| PRMKT अंध शाळा, भोसरी | साद ट्रस्ट, एरंडवणे |
| कान्होजी आंग्रे शाळा, फडगेट | नवक्षितिज, मारुंजी |
| कामायनी शाळा, गोखलेनगर | महिलाश्रम हायस्कूल, कर्वेनगर |
| अबनॉर्मल होम, गांधी भवन | उम्मीद आशा किरण (एअर फोर्स) शाळा, लोहगाव |
| दिलासा शाळा, लक्ष्मी रोड | डॉन शाळा, धानोरी |
| बाल कल्याण संस्था, औंध | जीवनज्योत संस्था, एरंडवणे |
| स्पेस, शास्त्री रोड | मेक माय ड्रीम फाउंडेशन, टिळक रोड |



एकूणच महिनाभर या निरागस जगात वावरण्याचा अनोखा अनुभव आम्ही सर्वांनी घेतला आणि समाधान, आनंद, अविस्मरणीय गोष्टींनी स्वप्न स्वरांचे संगीत स्पर्धेची पात्रता फेरी रंगतदार झाली. 'स्वप्न स्वरांचे' संगीत स्पर्धा २०१८ ची अंतिम फेरी १५ एप्रिल रोजी सकाळी ९ ते दुपारी २ या वेळेमध्ये घेण्याचे ठरविले आहे. तसेच संस्थेचा वार्षिक स्नेहसंमेलनात स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ त्याच दिवशी दुपारी ३ ते ५ या वेळेमध्ये म. ए. सो. सभागृह, मयूर कॉलनी, कोथरूड, पुणे येथे आयोजित केला आहे.

दिव्यांगत्वाच्या प्रकाराप्रमाणे अंतिम स्पर्धेसाठी ४ प्रमुख गट उदा. मतिमंद, ऑटीझम, सेरेब्रल पाल्सी व इतर असे करण्यात आले आहेत. इतर गटामध्ये शारीरिक विकलांग, दृष्टिहीन व गतिमंद असे सहभागी आहेत. पात्रता फेरीतील परीक्षकांनी सर्व गटात मिळून एकूण ६६ विद्यार्थ्यांची अंतिम फेरीसाठी निवड केलेली आहे.

अविनाश कुलकर्णी, गायत्री कुलकर्णी, विद्या कुलकर्णी, वैशाली देशपांडे, सीमा लिमये आणि मनोहर पुणतांबेकर यांनी पात्रता फेरीमध्ये परीक्षणाची धुरा समर्थपणे पेलली. पात्रता फेरीमधून गुणवंत स्पर्धकांची अंतिम फेरीसाठी निवड पारदर्शकपणे केली त्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार. या सर्वांनी आपला किमती वेळ आणि निरपेक्ष मदतीचा हात या कार्यासाठी दिल्याबद्दल त्यांचे आम्ही ऋणी आहोत.

सर्व शाळां, संस्थांमधील संगीत शिक्षक आणि सहकारी यांच्याबरोबर अंतिम फेरी पूर्व सभा १४ मार्च २०१८ रोजी बाल कल्याण संस्था, पुणे येथे आयोजित केली होती. सभेचा उद्देश सर्व निवड झालेल्या स्पर्धकांच्या संगीत सादरीकरणाच्या मर्यादा नीट समजून घेऊन त्याप्रमाणे अंतिम फेरीसाठी स्टेजची तयारी करणे हा होता. या साठी आवश्यक जागा उपलब्ध करून दिल्याबद्दल आम्ही बाल कल्याण संस्थेचे व्यवस्थापन व व्यवस्थापक अपर्णा पानसे यांचे मनःपूर्वक आभारी आहोत.

विशेष मुलांमध्ये दडलेल्या सुप्त गुणांना वाव मिळावा म्हणून आयोजित केलेल्या या संगीत स्पर्धेच्या पात्रता फेरीमध्ये मुलांच्या चेहऱ्यावरील निखळ आनंद व निरागस प्रतिसाद आम्हांला खूपच भावला. स्वतःमधील कला सादर करण्याची संधी तर त्यांना मिळालीच पण त्यामुळे त्यांच्यातील आत्मविश्वास प्रचंड दुणावला. त्यांचा आनंदाला सीमा नाही, याची जाणीव प्रत्यक्ष स्पर्धा घेताना झाली. शाळा, संस्था या पलीकडील विश्वामध्ये कोणीतरी आपल्या कलेला दाद देतेय आणि काही अपरिचित लोकांसमोर आपण कला सादर करतोय, हा अनुभव त्यांना मनमुराद आनंद देऊन गेला.

विशेष मुलांच्या कला गुणांना वाव मिळावा म्हणून पडद्यामागे अथक प्रयत्न निरपेक्षपणे करीत असलेल्या सर्व संगीत शिक्षकांच्या प्रयत्नांना सलाम!!!













## चित्रकला स्पर्धा - बक्षीस वितरण







## स्वयंसेवकांसाठी आवाहन....

आपण प्रत्यक्ष कार्यात सहभागी होऊन मदत करू शकता...

- ➢ मुलांना विषय समजून घेण्यातील अडचणी सोडवणे.
- ➢ मुलांसाठी ट्रेकिंग आयोजित करणे.
- ➢ मुलांसाठी संगीत, नृत्य, नाटक याद्वारे मनोरंजन आयोजित करणे.
- ➢ मुलांना बायोडेटा तयार करणे, योग्य नोकरीसाठी शोधमोहीम यासाठी मदत करू शकता.
- ➢ मुलांसाठी व्यक्तिमत्व विकास कार्यशाळा आयोजित करणे.
- ➢ मुलांसाठी विविध मान्यवर व्यक्तींची, डॉक्टर्सची लेक्चर्स आयोजित करणे. इ.
- ➢ संस्थेच्या विविध कार्यक्रमांमध्ये मदत करणे.

Great Software Laboratory Pvt. Ltd., Pune has sponsored Rs.5 Lakhs towards girl education program for academic year 2017-18. We are grateful to the management & CSR team of the company for their kind gesture.

## गुरुकुल

**गुरुकुल** एक नियोजित प्रकल्प - संस्थेने आपल्या गुरुकुल प्रकल्प उद्दिष्ट पूर्तीच्या दिशेने विचार सुरू केला आहे. एक एकर जागेमध्ये अंदाजे २०००० क्षेत्रफळ बांधकाम असलेले विशेष मुलांचे घरकुल म्हणजेच गुरुकुल. यासाठी पुण्यापासून जवळच जागा घेण्याचे निश्चित केले आहे. कमीतकमी ५० दिव्यांग राहू शकतील असे निवासी संकुल, ज्यामध्ये आवश्यक कर्मचारी राहण्याची सोय असेल. दिव्यांग मुलांच्या संपूर्ण मानसिक विकासाचा व सक्षमतेचा परिपूर्ण प्रयत्न गुरुकुलामध्ये असेल. गुरुकुल एक सांस्कृतिक केंद्र असेल. गुरुकुलामध्ये प्रामुख्याने खालील गोष्टींचा समावेश असेल.

- ➢ वसतिगृह व भोजनकक्षाची सोय
- ➢ कौशल्य विकास केंद्र
- ➢ व्यावसायिक प्रशिक्षण सुविधा
- ➢ वैद्यकीय सेवा कक्ष, प्री आणि पोस्ट ऑपरेटिव्ह केअर युनिट, दक्षता विभाग
- ➢ व्यायाम शाळा, योग विद्या विभाग, फिजिओथेरपी विभाग
- ➢ कृत्रिम अवयव उत्पादन विभाग
- ➢ मनोरंजन व करमणूक सुविधा - तरणतलाव, संगीत व नृत्य कक्ष, कला व क्राफ्ट विभाग
- ➢ ग्रंथालय (दृष्टिहीन मुलांसाठी ब्रेल मधील पुस्तके, साहित्य), सभागृह, संगणक विभाग, कर्णबधीर मुलांसाठी ऑडिओ रूम
- ➢ फळभाज्या, झाडे, फुले, फळे, सौर उर्जा प्रकल्प, पाणी पुनर्वापर प्रकल्प, बायोगॅस व निसर्गाशी समतोल साधणारे वातावरण
- ➢ हिरवागार परिसर

दुर्धर दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी - विविध उत्पन्नाचे स्रोत तयार केले जातील जेणेकरून ते स्वावलंबी व स्वाभिमानी आयुष्य जगू शकतील.

सर्वसमावेशक समाजासाठी जागरण चळवळ अव्याहत चालू राहील. सर्व प्रकारच्या दिव्यांगांसाठी अडथळाविरहीत वातावरण तयार करण्यासाठी पायाभूत सुविधांच्या विकासाबाबत जनजागरण चळवळ चालू राहील.

- ➢ ग्रामीण भागातील पुनर्वसन केंद्रे आवश्यकतेनुसार चालू केली जातील.

**आमचे हे स्वप्न साकारण्यात आपल्या सर्वांचा सहभाग अतिशय गरजेचा आहे...**

### नम्र आवाहन

- ➢ गुरुकुल प्रकल्प खर्च एकूण अंदाजे रु. १० कोटी असून त्यासाठी आपण देणगी देऊ शकता किंवा देणगीदार गोळा करू शकता.
- ➢ गुरुकुलासाठी सुयोग्य जागेची शोधमोहीम चालू आहे. त्यासाठी आपण मदत करू शकता. जागेसाठी साधारण रु. १ कोटी बजेट आहे. आत्तापर्यंत व्यवस्थापन खर्चात काटकसर करून आम्ही रु. ३० लाख जमवून शकलो आहे.
- ➢ एका विद्यार्थ्याच्या आवश्यक वार्षिक खर्चापोटी आपण देणगी देऊ शकता.

संस्थेने कायमस्वरूपी लोकांकडून मिळणाऱ्या देणग्यांवर अवलंबून न राहता भविष्यात आर्थिक स्वावलंबी होणे गरजेचे आहे असे आम्हांला मनापासून वाटते, त्यामुळे संस्थेचे नियोजित उपक्रम पूर्ण करताना स्वावलंबनाचा टप्पा पार करणे आवश्यक आहे. त्यासाठी अत्यंत तळमळीने आम्ही सर्वांना आवाहन करतो की आपल्या सढळ मदतीचा हात पुढे करा.

आम्हांला खात्री आहे की संस्थेकडून मदत घेऊन प्रगती केलेली मुले भविष्यात आपल्या सहकाऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहतील व त्यांनाही स्वतःच्या स्वप्नपूर्तीचा मार्ग गवसेल.

**आपली देणगी इन्कमटॅक्स ॲक्ट १९६१ कलम ८० जी नुसार ५०% सवलतीस पात्र आहे.**

MAKE MY DREAM FOUNDATION
A Completeness with unlimited abilities...

Regn. No.: E 5330 (Pune), Under Bombay Public Trust Act, 1950.
1533, Sadashiv Peth, Shivsagar Apartments, Second Floor, Tilak Road, Pune 411030. Tel.: +91-20-24479260. Email: makemydream@ymail.com
Visit us at: www.makemydream.org.in

Designed & Printed by G'NIUS GRAFIKS # 020-24479260